निवृत्तीवेतनधारक/ कुटुंब निवृत्तीवेतन
धारकांना दि. ०१ जुलै, २०१७ पासून
१३९% महागाई वाढ देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
**शासन निर्णय क्रमांक : निमवा-२०१८/प्र.क्र.७५/सेवा ४**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १६/०३/२०१८

वाचा -

१) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक :निमवा-२०१७/प्र. क्र.५९/सेवा ४, दिनांक २५.०९.२०१७

**शासन निर्णय -**

शासन असा आदेश देत आहे की, राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना त्यांच्या मूळ निवृत्तीवेतन/ कुटुंबनिवृत्तीवेतन आणि महागाई निवृत्तीवेतन/ महागाई कुटुंब निवृत्तीवेतन (असल्यास) यांच्या एकूण रकमेवर दिनांक ०१ जुलै,२०१७ पासून अनुज्ञेय महागाई वाढीचा दर १३६ % वरुन १३९% करण्यात यावा. व सदर महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम दि.०१ फेब्रुवारी, २०१७ पासून रोखीने देण्यात यावी. तसेच दिनांक ०१ जुलै,२०१७ ते दिनांक ३१ जानेवारी, २०१८ या ७ महिन्यांच्या कालावधीतील थकबाकीबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

२. प्रत्येक वैयक्तिक प्रकरणी देय होणाऱ्या महागाई वाढीच्या रकमेची परिगणना करण्याची जबाबदारी ही निवृत्तीवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजे यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांची राहील.

३. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तीवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषी विद्यापीठे यांमधील निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना वरील निर्णय, योग्य त्या फेरफारांसह, लागू राहील.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतु, अन्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांनाही लागू राहील.

५. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये/स्वायत्त संस्थांमध्ये/ स्थानिक संस्था इत्यादींमध्ये स्वत:ला सामावून घेतल्यानंतर एक रकमी ठोक रक्कम स्वीकारलेली आहे, व जे निवृत्तीवेतनाच्या १/३ इतका अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करण्यासाठी तसेच शासन निर्णय, वित्त विभाग,